# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१
Web:www.jdhepune.info
E_mail ID- admin@jdhepune.info
फोन नं.०२०-२६१२७८३३
फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक/अशाम/सांफुपुवि/२०२० /2779 दि.१४/१२/२०२०
प्रति,
महत्वाचे/ई-मेलद्वारे

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व कायमविनाअनुदानित/
विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वय नियुक्त करणेबाबत...
संदर्भ:- मा.संचालनालयाकडील क्र.उशिसं/२०२०/स्पर्धापरिक्षा/प्रशा-३/७६५६, दि.१७/११/२०२०.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशासकीय सेवापूर्व परिक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासांठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वोतोपरी प्रयत्न करीत असून पूर्ण राज्यात अशी ०६ भारतीय प्रशासकीय सेवापूर्व परिक्षा केंद्रे शासनाने सुरु केलेली आहेत. यात संबंधित विषयाच्या तज्ज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्रामधून दरवर्षी सुमारे ५४० मुलांना विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येते, शिवाय त्यांना मासिक खर्चासाठी दरमहा शिष्यवृत्तीही दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परिक्षा देणाऱ्या मुलांची संख्या वाढली आहे. परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही, असे दिसून येते. यासंदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परिक्षेसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जास्त मुलांकडून फॉर्म भरला जाईल, यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाद्वारे स्थापन केलेल्या परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश परिक्षेसाठी मार्गदर्शक करणे इ. सर्व काम करणेसाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शक करु शकणाऱ्या

सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करावी. जेणेकरुन त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळू शकेल. यास्तव आपल्या महाविद्यालयातील अशा सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक केलेल्या नेमणूक आदेशाची प्रत या कार्यालयास तसेच संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिव यांना देण्यात यावी.

उक्तप्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास उलटटपाली सादर करण्यात यावा.

सदर सूचना या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी असून महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगमार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांमध्ये महाराष्ट्रातील अधिक विद्यार्थी यशस्वी व्हावीत यासाठी आहे. सदर समन्वयक पदासाठी कोणतेही मानधन/विशेष वेतन लागू होणार नाही.

(डॉ.मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:-

१) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.

२/- यांना कळविण्यात येते की, स्पर्धा परिक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य त्या सूचना आपल्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांना द्याव्यात. विद्यापीठस्तरावर एक समन्वय समिती नेमावी व समितीमार्फत सर्व महाविद्यालयातील केंद्रांना वेळोवेळी व नियमित मार्गदर्शन करण्यात यावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करताना केवळ संख्यात्मक अहवाल सादर करावा.